MHBH090013022022

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.
**246 / 2022**
शैलेश –वि.– निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, भंडारा / गोंदिया.

## निशाणी 1 वरील सुप्रतनामा अर्जावरील पारित आदेश
(पारित दि.14 / 11 / 2022)

1. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 457 नुसार सुप्रतनाम्यावर जप्त वाहन सोडण्यासाठी सदरचा अर्ज सादर करण्यात आला आहे.

2. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमपी–31 / यु 5883 ही त्याच्या मालकीची आहे. उपरोक्त वाहन राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, भंडारा / गोंदिया यांनी मुंबई दारूबंदी कायदाचे कलम 65(ई) चा गुन्हा क्र.392 / 2022 मध्ये जप्त केला. तो मजूर असून सदर वाहन दैनंदीन कामासाठी त्याला हवी आहे. गुन्हयाचा तपास पुर्ण झाला. जर वाहन राज्य उत्पादन शुल्क विभागात न वापरता ठेवल्यास तर त्याला जंग लागून नुकसान होईल. आवश्यक तो बंधपत्र आणि सुप्रतनामा देण्यास तयार आहे. म्हणून, वाहन सुप्रतनाम्यावर सोडण्याबाबत आदेश पारीत करण्यात यावा.

3. निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, भंडारा यांनी निशाणी क्र. 5 वर खुलासा सादर करून अर्जदाराने सदर दुचाकी वाहनाचे परवाने, मालकी हक्काबाबत कोणतेही कागदपत्रे सादर केली नाही, तसेच वाहन सुप्रतनाम्यावर सुटल्यास अर्जदार हा त्या वाहनाचा पुन्हा अवैद्य हातभट्टी दारूची वाहतूक करण्यासाठी वापर करेल म्हणून वाहन सुप्रतनाम्यावर देण्यात

येवू नये असे म्हणने मांडले आहे. विद्वान सरकारी वकीलांनी निशाणी 01 म्हणणे दिले की योग्य तो आदेश पारीत करण्यात यावा. तपासी अधिका–याच्या म्हणण्यावरून तो उपरोक्त वाहन आरोपी भुजबळ अवतरे याच्या ताब्यातून जप्त करण्यात आल्याचे दिसल्यामुळे त्याचा लेखी म्हणणे मागण्यात आला. त्याने त्याचे लेखी म्हणणे निशाणी 06 वर शपथेवर दाखल केले. त्यावरून त्याचे म्हणणे असे दिसते की अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक असून त्याचा मित्र आहे. तो वापरण्यासाठी घेतला होता आणि जप्त करण्यात आला. सदर वाहन अर्जदारास दिल्यास त्याची कोणतीही हरकत नाही.

4. अर्ज, लेखी म्हणणे आणि अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

5. अर्जदाराने अर्जातील मजकूर शपथेवर पुनरउच्चार केलेला दिसतो. त्याने अभिलेखावर दाखल केलेल्या वाहनाच्या आर.सी. बुकच्या सत्यप्रतीवरून हे स्पष्ट होत आहे की, तो जप्त वाहनाचा नोंदणीकृत मालक आहे. गुन्हयाचा तपास देखील पुर्ण झालेला दिसतो. नक्कीच प्रकरणाची सुनावनी होवून निकाल लागण्यास वेळ लागणार आहे. अशा परिस्थितीमध्ये वाहन न वापरता राज्य उत्पादन शुल्क विभागात ठेवल्यास नक्कीच त्याला जंग लागून नुकसान होवू शकते. तसेच वाहन न सोडता ते राज्य उत्पादन शुल्क विभागात पडून राहिल्यास त्याचा कोणलाही काहीएक उपयोग होत नाही असे दिसते. म्हणून उपरोक्त बाबी आणि तपासी अंमलदार यांनी व्यक्त केलेल्या बाब्या लक्षात घेवून खालील आदेश देणे न्यायोचीत होईल या मतास मी येवून पुढील आदेश पारीत करीत आहे –

# <u>आदेश</u>

1) निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, भंडारा/गोंदियाच्या गुन्हा क्र.392/2022 च्या तपासात जप्त करण्यात आलेली हिरो होंडा स्प्लेंडर कंपनीची मोटार सायकल क्र. एमपी–31/यु 5883 हे वाहन अर्जदाराला रक्कम रूपये 80,000/– च्या सुप्रतनामा बंधपत्रावर जेव्हा आदेश मिळेल तेव्हा जप्त वाहन हजर करावे, जप्त वाहनाचा वापर बेकायदेशीर कृत्यासाठी करू नये, वाहनांचे कुठल्याहीप्रकारे हस्तांतरण करू नये, वाहनाचे कुठल्याही प्रकारे रंग स्वरूप बदलवू नये आणि वाहनाचे फोटो पुराव्या दरम्यान आव्हानीत करू नये या अटींवर सोडून देण्यात येते.

2) सुप्रतनामा बंधपत्र तपासी अधिकाऱ्यापुढे सादर करण्यात यावे

3) वाहन सोडून देण्याआधी तपासी अधिकाऱ्याने अर्जदाराच्या खर्चाने वाहनाचा चेसीस व इंजिन नंबरसह फोटो काढावेत आणि वाहन अर्जदारास ताब्यात देण्याचा पंचनामा करावा.

4) सुप्रतनामा बंधपत्र, वाहनाचे फोटो, वाहन ताब्यात दिल्याचा पंचनामा आणि हमदस्तची प्रत दोषारोपपत्रासोबत न्यायालयात सादर करण्याचे निर्देश तपासी अधिकाऱ्यास देण्यात येते.

5) प्रमाणित केलेली आदेशाची प्रत हमदस्त म्हणून जारी करण्यात येते.

स्वाक्षरी/–

( एस.बी. गणपा )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
तुमसर.

दिनांक : 14/11/2022.